Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 12 December 2024

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १२ डिसेंबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.**

****

केंद्र सरकारने गव्हाच्या साठ्याच्या मर्यादेत बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयानं एका निवेदनाद्वारे ही माहिती दिली. देशात गहू मुबलक प्रमाणात असल्याचंही यात स्पष्ट करण्यात आलं आहे. हे बदल ३१ मार्च २०२५ पर्यंत लागू असतील. आता मोठे व्यापारी आणि घाऊक विक्रेत्यांसाठी गव्हाच्या साठ्याची मर्यादा दोन हजार टनांवरुन एक हजार टनापर्यंत कमी करण्यात आली आहे. किरकोळ विक्रेत्यांसाठी प्रती विक्री कक्षासाठीची मर्यादा दहा टनांवरुन पाच टनांपर्यंत आणण्यात आली आहे. अन्नसुरक्षेचं नियोजन करण्यासाठी आणि काळा बाजार रोखण्यासाठी केंद्र सरकारनं गव्हाच्या साठ्यावर मर्यादा घातली होती.

****

भारताची २०३५ पर्यंत भारत अंतरिक्ष स्टेशन हे स्वत:चं अवकाश स्थानक उभारण्याची योजना असल्याचं, विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी सांगितलं. दिल्लीत विज्ञानविषयक मंत्रालयांची कामगिरी या विषयावर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. भारताची २०४० पर्यंत चंद्रावर उतरण्यासाठीचीही योजना असल्याचं त्यांनी सांगितलं. केंद्र सरकारने अवकाश क्षेत्रात केलेल्या सुधारणांची जितेंद्र सिंह यांनी माहिती दिली. आतापर्यंत ४३२ परदेशी उपग्रह भारतातून प्रक्षेपित केले असून, त्यातले ९० टक्के उपग्रह गेल्या दहा वर्षात प्रक्षेपित झाल्याचं त्यांनी सांगितलं. जैवतंत्रज्ञान, जैव अर्थव्यवस्था, संरक्षण आणि कृषी या क्षेत्रामध्ये विज्ञानाच्या माध्यमातून भारतानं मोठी भरारी घेतल्याचं त्यांनी नमूद केलं.

****

बहुपैलू चित्रकर्मी राज कपूर यांच्या कुटुंबियांनी काल नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. राज कपूर यांची जन्मशताब्दी येत्या १४ तारखेला असून,

त्यानिमित्तानं ४० शहरांमध्ये उद्यापासून १५ तारखेपर्यंत राज कपूर चित्रपट महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. त्यासाठी कपूर कुटुंबियांनी पंतप्रधानांना आमंत्रण दिलं. राज कपूर यांनी जगाला भारताचं महत्व दाखवून दिलं, त्यांचा करिष्मा मध्य आशियात अजूनही कायम असून, त्यांच्या जीवनावर चित्रपट बनवावा, असं पंतप्रधान यावेळी म्हणाले.

****

लोकसभेत काल रेल्वे सुधारणा विधेयक, २०२४ आवाजी मतदानानं संमत झालं. रेल्वे नियम १९८९ मध्ये सुधारणा करण्याची तरतूद या विधेयकात आहे. यामुळे रेल्वे बोर्डाची अधिकारक्षमता तसंच स्वायत्तता वाढेल. रेल्वेच्या कायदेशीर चौकटीचं सुलभीकरण करण्याच्या दृष्टीनं हे विधेयक मांडल्याचं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं.

दळणवळण मंत्रालयानं भारत सिक्स जी व्हिजन नुसार कृती योजना बनवण्यासाठी भारत सिक्स जी आघाडी गठीत केली आहे. दळणवळण राज्यमंत्री डॉक्टर पी. चंद्रशेखर यांनी आज लोकसभेत एका लेखी उत्तरात याबद्दलची माहिती दिली.

भारत या ब्रँडखाली किरकोळ विक्री करण्यासाठी तीन लाख टनांहून अधिक हरभरा डाळीचा अतिरिक्त साठा मंजूर केला असल्याची माहिती केंद्रीय मंत्री बी एल वर्मा यांनी लोकसभेत दिली.

****

जून ते ऑक्टोबर २०२४ या कालावधीमध्ये अतिवृष्टी, पूर यामुळे शेत पिकांच्या झालेल्या नुकसानीकरता राज्य सरकारने निधी मंजूर केला आहे. धाराशिव जिल्ह्यातल्या एक लाख ६३ हजार ९७ हेक्टर क्षेत्रावरील एक लाख ८० हजार ७८६ शेतकऱ्यांच्या शेत पिकांचं नुकसान झाल्याचा अहवाल जिल्हा प्रशासनाने पाठवला होता, या नुकसानीपोटी २२१ कोटी ८१ लाख ३० हजार रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

नांदेड जिल्ह्यातही सप्टेंबरमध्ये झालेल्या अतिवृष्टीसाठी ८१२ कोटी नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली आहे. जिल्ह्यातल्या सात लाख ८३ हजार ९१५ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात डीबीटीद्वारे ही रक्कम थेट जमा करण्यात येणार आहे.

****

नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी काल मुखेड तालुक्यातल्या खरब खडगाव, चांडोळा तांडा आणि बिल्लाळी गावांना भेट देत जलजीवन मिशन आणि स्वच्छ भारत मिशन अंतर्गत सुरू असलेल्या कामांची

पाहणी केली. विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी गावकऱ्यांना येणाऱ्या अडचणी, उद्भवणाऱ्या समस्या आणि गैरसमज दूर करण्यासाठी कर्मचाऱ्यांनी योग्य समन्वय ठेवल्यास कामं जलद गतीने होतील, असं करनवाल यांनी यावेळी सांगितलं.

****

नांदेड जिल्ह्यात श्रीक्षेत्र माहूर इथं दत्तशिखर गडावर आजपासून दत्त जयंती उत्सव सोहळ्याला प्रारंभ झाला. परवा १४ डिसेंबर रोजी दुपारी बारा ते दोन या वेळेत दत्त जन्मोत्सव सोहळा साजरा होणार आहे. १७ डिसेंबरला काकड आरतीने दत्त जयंती उत्सवाची सांगता होईल. या सोहळ्यानिमित्त एसटीच्या माहूर आगारातून अतिरिक्त बस सोडल्या जाणार आहेत. आरोग्य विभागाकडूनही ठिकठिकाणी आरोग्य पथक तसंच रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

****

फिडे जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत आज दुपारी भारताचा ग्रँड मास्टर डी गुकेश आणि चीनचा डिंग लिरेन यांच्यात चौदावा आणि अंतिम सामना होणार आहे. या सामन्यातील विजेत्याला जागतिक विजेत्याचा मान मिळणार आहे.

****